# माहेर

किती सांगू या “माहेराची कवितिके”
उपमा रूपके, सर्व शब्द पडतात फिके

माहेर म्हणजे जिथे जाऊन आपण
अगदी ‘खुल्ले’ ठेवतो आपले चलन-वळण

माहेर म्हणजे जिथे “असे का केले, तसे का केले”
भले कुणाचे ऐकावे लागत नाही कधी असले

माहेर म्हणजे जिथे लोक चहू दिशा
उत्सुक असतात पूर्ण करण्यास आपल्या मनीषा

माहेर म्हणजे जिथे कुणी कधीही
आपल्याला कमी लेखत नाही

माहेर म्हणजे जिथली हवा देखील
असते मुक्त प्रसन्न अवखळ सलील

माहेर म्हणजे जिथे कुणी सांगत नाही काम
आणि रागवतही नाही जर फक्त केला आराम

माहेर म्हणजे जिथे नसते काही शिस्त
चालते तुम्ही केले तूप सारे फस्त

माहेर म्हणजे जिथे होतात सुहृदांच्या गाठी
हवे त्याला आपण मारू शकतो मिठी

माहेर म्हणजे जिथे खाण्यापिण्याची चंगळ
“खाऊ नकोस, जाड होशील” बोलत नाहीत अमंगळ

माहेर म्हणजे जिथे हवे तितके झोपा
छे आळशी नाही, हा तर सासुरवासाचा वचपा

By Abhay B. Joshi